जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७१ दिनांक - १८/०५/२०२३**

## चंदननगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## फसवणुक करणा-या आरोपीला पश्चिम बंगाल मधुन केले जेरबंद

यातील फिर्यादी वय ६८ वर्षे रा.खराडी पुणे यांनी दि.१९/०१/२०२३ रोजी ऑनलाईन औषधे कुरियरने मागवले होते.सदर कुरीयर कुठपर्यंत आले हे तपासण्यासाठी फिर्यादी यांनी ऑनलाईन गुगलवर सर्च करुन मोबाईल क्रमांक मिळवुन सदर मोबाईल धारक याला फोन करुन विचारणा केली असता सदर मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना पार्सल बाबत माहिती देण्याचे बहाण्याने लिंक पाठवुन सदर लिंक क्लिक करावयास लावुन फिर्यादी यांची १,२३,९९९/- रुपयांची आर्थिक फसवणुक केले बाबत चंदननगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ७८/२०२३ भादवि कलम ४१९,४२० आयटी ॲक्ट ६६(सी)६६(डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने फिर्यादी यांचे फसवणुक झालेल्या पैशाबाबत तसेच बँक खाते धारकाबाबत माहिती घेतली असता सदरचा बँक खाते धारक हा पश्चिम बंगाल या राज्यातील असल्याचे समजुन आले.सदर बँक खात्याला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांक व जीमेल आयडीची माहिती घेतली असता सदरचे मोबाईलचे लोकेशन व जीमेलच्या आयपी ॲड्रेसवरुन प्राप्त झालेल्या मोबाईल क्रमांकाचे लोकेशन हे पश्चिम बंगाल राज्यामधील दक्षिण दिनाजपुर येथील असल्याचे समजुन आले.सदर ठिकाणी चंदननगर पोलीस स्टेशन येथील सायबर पथकाचे पोउपनि रामेश्वर रेवले,पोहवा ३०५५ उकिर्डे,पोशि १०७२८ शिंदे असे तपासकामी जावुन प्राप्त मोबाईल क्रमांकाचे लोकेशन नुसार तपन पोलीस स्टेशन,दक्षिण दिनाजपुर पश्चिम बंगाल येथील स्थानिक पोलीसांची मदत घेवुन फसवणुक करणा-या मोबाईल धारक इसम नामे समीर नरेश रॉय वय २१ वर्षे रा.बज्रपुकुर,नया बाजार दक्षिण दिनाजपुर,पश्चिम बंगाल यास ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता सदर गुन्हा त्याने केल्याचे निषन्न झाल्याने त्याला नमुद गुन्हयात तपन पोलीस स्टेशन येथे दि.१२/०५/२०२३ रोजी अटक करुन त्यास दि.१३/०५/२०२३ रोजी ट्रान्झीस्ट रिमांड करता सीजीएम कोर्ट बालुरघाट,दक्षिण दिनाजपुर पश्चिम बंगाल येथे हजर करुन मा.कोर्टाकडुन त्याची ०६ दिवसांची ट्रान्झीस्ट रिमांड मंजुर केली. त्यास दि.१६/०५/२०२३ रोजी मा.शिवाजीनगर न्यायालय पुणे येथे हजर केले असता मा.न्यायालयाने त्याची दि.१९/०५/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त परि ०४, श्री.शशिकांत बोराटे मा.सहा पोलीस आयुक्त येरवड विभाग श्री.किशोर जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेद्र लांडगे, पोलीस निरीक्षक गुन्हे जगन्नाथ जानकर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि पोउपनि रामेश्वर रेवले,पोहवा उकिर्डे, मपोना मेमाणे, पो.अमंलदार शिंदे, म.पो.अमंलदार डहाळे यांनी केली असुन सदर गुन्हयातील पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रेवले,चंदननगर पोलीस स्टेशन करत आहेत.